# रामदास स्वामी व संत तुकाराम महाराज यांच्या विचारांचे शिवाजी महाराजांनी अनुकरण केले : कानेटकर



**नाशिक :**– संत तुकाराम व समर्थ रामदास स्वामी यांनी शिवाजी महाराजांना राज्यकारभार चालविण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले, व त्यानुसारच शिवाजी महाराजांनी राज्यकारभार केला व आपले नाव अजरामर केले, असे प्रतिपादन सच्चिदानंद कानेटकर यांनी केले.

आगरटाकळी येथील मारुती देवस्थान व रामदास स्वामी मठात रामनवमीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफताना सच्चिदानंद कानेटकर बोलत होते.यावेळी त्यांनी संत तुकाराम, समर्थ रामदास स्वामी व शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील जीवनपट उलगडून दाखविला. रामदास स्वामी हे शिवाजी महाराजांचे गुरु होते, तर तुकाराम महाराजांना शिवाजी महाराज आपले मार्गदर्शक मानत, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाप्रसंगी सुधीर शिरवाडकर, ज्योतीराव खैरनार, दैनिक भ्रमरचे संपादक चंदुलाल शाह उपस्थित होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष एन. के. ब्रह्मे यांनी सच्चिदानंद कानेटकर व दैनिक भ्रमरचे संपादक चंदुलाल शाह यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. ज्योतीराव खैरनार यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला.